नियमित फौजदारी खटला क्र. २११/२०२३

विठ्ठल वि बाबुराव व इतर

निशाणी क्र. १८

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष**

मी याद्वारे शपथेवर कथन करतो की,

माझे नाव – विठ्ठल संपत जाधव,

माझे वय – ४८ वर्षे, व्यवसाय –शेती

राहणार – रा. शेरेशिंदेवाडी, ता. फलटण, जि.सातारा

**सरतपासणी – फिर्यादीतर्फे वकील श्री.व्ही.डी.कदम यांचेमार्फत शपथेवर सुरु–**

आरोपी क्र.१ माझा भाऊ आहे, आरोपी क्र.४ ही माझी भावजय आहे व आरोपी क्र.२ हा माझा पुतण्या आहे. आरोपी क्र.३ रोशन जाधव हा अज्ञान आहे. त्यामुळे त्याचे नाव कमी केले आहे. घटना दि.२०.१०.२०२१ रोजी घडली. साक्षीदार सांगतो की, मला तारीख लक्षात नाही. घटनेच्या दिवशी सकाळी ७.३० वाजता गट क्र. १३३ मध्ये मी भाजीपालासाठी पाणी सोडायला गेलो होतो. सदर गटात विहीर, पाईप लाईन व मोटार आहे. त्या विहीरीच्या पाण्यातुन गट क्र.१३३ मधील जमीनीला पाणी घेतो. सदर विहीरीला सिमेंट पोल व तारेचे कम्पाऊंड केले होते. त्यावेळी सकाळी ७.३० वाजता मी गेलो तेव्हा सिमेंटचे पोल पडलेले होते, मोटारची पाईप कापली होती, मीटर बॉक्स फोडलेला होता, मोटारची दोरी कु–हाडीने तोडली होती व त्यामुळे ती विहीरीत पडली होती. वायर कापल्याने लाईट बंद झाली होती. पाईप लाईन फोडली होती. त्यानंतर मी घरी आलो होतो. त्याच दिवशी रात्री ८.०० वाजता आरोपी क्र.२ शंतनु याने मला शिवीगाळ केली होती. त्याला मी विचारले असता त्याने पाईप लाईन आम्ही कु–हाडीने तोडली, काय करायचे ते कर. तो म्हटला की, पिके कशी काढतो ते पाहतो. सर्व आरोपींनी मला शिवीगाळ केली, मारण्याची धमकी दिली. त्यावेळी माझे काका निवृत्ती निकम हे तेथे आले होते. त्यांनी पाहिले. आरोपी क्र.४ ने माझ्या पत्नीला शिवीगाळ केली होती. सकाळी ८.०० ते ९.०० वाजता शंतनु व बाबुराव हे माझ्या अंगावर काठी घेवून मारायला आले होते. त्यावेळी माझे काका निवृत्ती निकम यांनी सोडवासोडवी केली होती. आम्ही बरड आऊट पोस्टला तक्रार देण्याकरीता गेलो होतो, तेथे तक्रार घेतली नाही.

त्यानंतर फलटण ग्रामीण पो.स्टेशनला फिर्याद दिली होती. मी फलटण ग्रामीण पो.स्टेशनला दिलेली एन.सी. मला दाखवण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१९** देण्यात येत आहे. मी घटनास्थळाचे फोटो दाखल केलेले आहेत. त्यास **आर्टीकल अ,ब,क** देण्यात येत आहेत. मी गट क्र.१३३ चा ७/१२ उतारा दाखल केलेला आहे. त्यास **नि.क्र.२०** देण्यात येत आहे. आरोपींनी माझ्या पिकांची नुकसानी केलेली आहे, तोडफोड केलेली आहे. आरोपींना कडक शासन करण्यात यावे व मला नुकसान भरपाई मिळावी.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे श्री. आर.व्ही.बोराटे यांचेमार्फत सुरु –</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, सिमेंटचे पोल पडलेले होते, मोटारची पाईप कापली होती, मीटर बॉक्स फोडलेला होता, मोटारची दोरी कु–हाडीने तोडली होती व त्यामुळे ती विहीरीत पडली होती, वायर कापल्याने लाईट बंद झाली होती, पाईप लाईन फोडली होती इ. बाबी कोणत्या व्यक्तीने केल्या ते मी किंवा इतर कोणीही प्रत्यक्ष पाहिलेले नाही. गट क्र. १३३ हा माझ्या एकटयाच्या मालकीचा आहे. मी उतारा दाखल केलेला आहे. बरड पोलिसांनी तक्रार घेतली नाही म्हणून त्याच दिवशी आम्ही त्यांच्या वरिष्ठांकडे तक्रार देण्यासाठी गेलो नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी त्याच दिवशी फलटण ग्रामीण पो.स्टे.ला गेलो नाही. गट क्र. १३३ हा मी खरेदी घेतलेला आहे. मी आजरोजी सांगितलेली घटनेची तारीख २०.१०.२०२१ ही चुकीने सांगितलेली आहे. मी तक्रार दाखल करताना माझ्या वकिलांना सांगितले होते की, आरोपी क्र.२ शंतुन याने मला शिवीगाळ केली होती, तो मला म्हणाला होता की, पिके कशी घेतो ते मी पाहतो, आरोपींनी मला शिवीगाळ केली व मारण्याची धमकी दिली. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथित घटनेपूर्वीपासून आरोपीचे माझ्याकडे येणे जाणे नाही किंवा बोलणे चालणे नाही.

**<u>आरोपीच्या वकीलांनी पुढील उलटतपास दोषारोप निश्चितीपर्यंत राखून ठेवण्याची विनंती केली त्यामुळे उलटतपास तहकूब करण्यात येतो.</u>**

फलटण. (ए. एस. साटोटे)

दिनांक – ०३.११.२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, फलटण